# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तहसील मधील नांदगाव (सूर्या), कवढाळा येथील शेतजमिन रत्नागिरी प्रा.लि.कंपनीने अल्पदरात उद्योगासाठी अधिगृहीत केल्याबाबत**

**(१) १४८२८ (०७-०४-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तहसील मधील नांदगाव (सूर्या), कवढाळा येथील शेतजमिन रत्नागिरी प्रा.लि.कंपनीने अल्पदरात उद्योगासाठी अधिगृहीत ६२.०६ हे आर जमीन केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतजमिन १९९२-९३ मध्ये अधिग्रहित करून २२ वर्षाचा कालावधी घेऊनही उद्योग सुरू न होणे व कराराची पुर्तता न झाल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधी यांनी मा. महसूल मंत्री यांना निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन (विदर्भ प्रदेश) अधिनियमाच्या कलम ८९-अ खाली विकास आयुक्त (उद्योग) यांच्या दि.२५/०१/१९९५ च्या आदेशान्वये रत्नागिरी बिल्डिंग प्रॉडक्टस लि. यांनी मौजे नांदगाव, कवडाणा एकोठी, भोयेंगाव ता.कोरपना येथे सिमेंट मॅन्युफॅक्चरींग युनिट स्थापन करण्यासाठी ४९६.३४ हेक्टर शेतजमिन खरेदी केली होती.

तथापि, सदर कंपनीने या जमिनीचा औद्योगिक वापर विहीत मुदतीत न केल्यामुळे विकास आयुक्त (उद्योग) यांनी त्यांच्या आदेश दि.१४/०७/२०१५ अन्वये या कंपानीस औद्योगिक कारणास्तव शेतजमिन खरेदी करण्यासाठी देण्यात आलेली परवानगी रद्द केली आहे.

---

**थेरगांव (ता.मावळ,जि.पुणे) येथील आदित्य बिर्ला हॉस्पीटलला दिलेली जमीन काढून घेण्याबाबत जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावाबाबत**

**(२) २८२७९ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरकारी जागा तसेच अन्य सवलती देण्याच्या बदल्यात गोरगरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी दहा टक्के खाटा राखीव ठेवण्याच्या अटीवर आदित्य बिर्ला हॉस्पिटला थेरगांव (ता.मावळ, जि.पुणे) येथील सहा हेक्टर ३७ आर इतकी जागा देण्यात आली असून सदर रुग्णालयात गोरगरीब व दुर्बल घटकासाठी खाटा राखीव ठेवत नसल्याप्रकरणी आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मावळचे प्रांतधिकाऱ्यांनी रुग्णालयाला एप्रिल, २०१५ च्या सुमारास पाठविलेल्या नोटीसला रुग्णालयाने उत्तरही दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारी जागा किंवा अन्य सवलती दिलेल्या रुग्णालयाने त्याना घातलेल्या अटीची पूर्तता न केल्याबद्दल, आदित्य बिर्ला हॉस्पीटला दिलेली सहा हेक्टर ३७ आर जागा काढून घेण्यात यावी असा प्रस्ताव, जिल्हा प्रशासनाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर विभागीय आयुक्त, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**इचलकरंजी येथे एमआयडीसीच्या धरतीवर २४ तास कर्मचारी असलेली मोबाईल व्हॅन खासबाब म्हणून देणेबाबत**

**(३) २८५१७ (०८-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी हे औद्योगिक शहर असल्याने एमआयडीसीच्या धरतीवर २४ तास कर्मचारी असलेली मोबाईल व्हॅन खासबाब म्हणुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री ऊर्जा यांच्याकडे माहे जुलै २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) इचलकरंजी विभागातील तीनही उपविभाग हे एम.आय.डी.सी. एरीयामध्ये येत नसून तिथे मोठ्या प्रमाणात यंत्रमाग उद्योग व इतर उद्योग चालतात. २४ तास कर्मचारी असलेली मोबाईल व्हॅन ही तरतूद फक्त जास्त महसूल प्राप्त होत असलेल्या एम.आय.डी.सी. एरीया मधील ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठ्याची सेवा देण्याकरिता होती. त्यामुळे इचलकंरजी शहरासाठी २४ तस कर्मचारी असलेल्या मोबाईल व्हॅन उपलब्ध करुन देता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तीनही वीज कंपन्यामधील वीज कर्मचाऱ्यांच्या मेडीक्लेम सुविधेबाबत**

**(४) २८५६० (०८-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तीनही वीज कंपन्यानमध्ये कार्यरत असलेल्या तब्बल ८५ हजार वीज कामगारांच्या मेडिक्लेमची दुसऱ्या टप्प्यातील रक्कम सदर वीज कंपन्यांनी न भरल्यामुळे ओरिएंटल इंशुरन्स कंपनीने माहे जानेवारी २०१५ पासून वैद्यकीय लाभ देणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वीज कर्मचा-यांना मेडिक्लेम सुविधेचा लाभ मिळण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२००५ ते ३१.१२.२०१५ पर्यंत वैद्यकिय विमा योजना लागू करण्यात आली होती. या योजनेची रक्कम टप्प्याटप्प्याने विमा कंपनीकडे जमा करण्यात आलेली आहे. तसेच तिन्ही कंपनीतील कर्मचारी व त्यांच्या अवलंबितांसाठी दि.०१.०१.२०१६ पासेन नविन वैद्यकिय विमा योजना लागू करण्यात आली असून तिची मुदत दि.३१.१२.२०१६ पर्यंत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारत सरकारच्या दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योत योजना वा आय.पी.डी एस (इन्फ्रा-२) अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील विद्युतीकरण संबंधित कामांमध्ये समाविष्ट-करण्याबाबत**

**(५) २८९०४ (०८-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकारच्या दिन दयाळ उपाध्याय ग्राम ज्योत योजना वा आय.पी.डी एस (इन्फ्रा-२) अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील विद्युतीकरण संबंधित कामांमध्ये अचलपूर-

चांदूरबाजार विधानसभा मतदारसंघातील कामे समाविष्ठ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनास लेखी निवेदनाद्वारे मागणी केल्यामुळे माननीय उर्जा मंत्री महोदयांनी सदर कामांचा समावेश करण्याबाबत संबंधिताना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.ऊर्जा मंत्री यांनी कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामांची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) होय. सदर निवेदनातील कामाचा समावेश दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना, आय.पी.डी. एस व इतर योजनेत करण्यात आला आहे.

(३) दिनदयाल उपाध्यास ग्रामज्योती व आयपीडीएस या योजनेस केंद्र शासनाची नुकतीच मंजुरी मिळाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात नदी व विहिरींला मुबलक पाणी असूनही शेतकरी कृषिपंपाच्या वीज जोडणीच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(६) २९०५० (२३-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात नदी व विहिरींच्या माध्यमातून मुबलक पाणी उपलब्ध असूनही शाहुवाडी तालुक्यात ४२८ शेतकरी कृषिपंपाच्या वीज जोडणी पासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुबलक पाणी असूनही केवळ वीज जोडणी अभावी पिकांना वेळेवर पाणी न देता आल्यामुळे पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पायाभूत सुविधांची कामे ठेकेदारांकडून संथ गतीने सुरु असल्याने सन २०१२ पासून शेतकरी वीज जोडणी पासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांना तातडीने कृषिपंप वीज जोडणी देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे. शाहुवाडी तालुक्यांतर्गत डिसेंबर, २०१५ अखेर पैसे भरुन नवीन कृषीपंत वीज जोडणीसाठी ५२९ अर्ज प्रलंबित आहेत.

(२) व (३) अंशतः खरे आहे. मागील ३ वर्षात शाहूवाडी तालुक्यात एकूण ६६३ नवीन कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच २०१५-१६ मध्ये डिसेंबर, २०१५ अखेर १२९ नवीन कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली आहे.

(४) पायाभूत आराखडा २ चे ठेकेदार मे. प्रतिभा आणि प्रतिक यांच्या कामाच्या प्रगतीचा वेग निर्धारित उद्दिष्टांपेक्षा खूपच कमी असल्यामुळे त्यांचे कंत्राट अंशत: रद्द करुन नवीन उपविभागनिहाय ठेकेदारांची नियुक्ती महावितरण कंपनीने केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उर्जा विभागाच्या महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यां देण्याबाबत**

**(७) २९२९२ (२३-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उर्जा विभागाच्या महावितरण, महापरिषण आणि महानिर्मिती या तीन कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन त्यांना विशिष्ट कालमर्यादित सामावून घेण्याचे धोरण आखण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ०४ ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत राज्यशासनाने निर्णय घेऊन त्यांची अमंलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये समाविष्ठ करण्यात आले वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) व (२) महानिर्मिती कडून असा प्रस्ताव प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई जवळील जागतिक किर्तीच्या धारापूरी बेटावर कायमस्वरुपी वीज पुरवठा करण्याचा प्रकल्प महावितरणने तयार केला असल्याबाबत**

**(८) २९९४० (२३-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जवळील जागतिक किर्तीच्या धारापूरी बेटावर कायमस्वरुपी वीज पुरवठा करण्याचा प्रकल्प महावितरणने तयार केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) घारापुरी बेटावर कायमस्वरुपी वीज पुरवठा करण्यासाठी अंदाजपत्रकात रु.१६.६३५ कोटी मंजूर करण्यात आले आहे. मे. एम.एम.आर.डी.ए. यांनी सदरचा निधी उपलब्ध करुन दिला असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगारतर्फे ताराबाई पार्क येथील परिमंडळ कार्यालयासमोर धरणे आंदोलन केल्याबाबत

**(९) ३०६९७ (०८-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगारतर्फे ताराबाई पार्क येथील परिमंडळ कार्यालयासमोर दिनांक १५ सप्टेबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,
(३) असल्यास सदर मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य वीज कंत्राटी कामगार संघ यांनी दि.२७.०८.२०१५ च्या पत्रान्वये कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन, अन्यायकारक बदल्या न करणे व त्यांना रोजंदारी कर्मचारी म्हणून सेवेत घेणे इ. मागण्या केल्या होत्या.
(३) सदर संघाच्या पदाधिकाऱ्याबरोबर अधिक्षक अभियंता, कोल्हापूर परिमंडळ यांनी चर्चा केली. चर्चेत ठरल्यानुसार थकित वेतन अदा करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात वीज कंपनीत मोठया प्रमाणात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(१०) ३१४०४ (२३-१२-२०१५). श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात वीज कंपनीत मोठया प्रमाणात (१८९) रिक्त असलेली पदे भरण्यात न आल्याने ग्राहकांना योग्य वीज सेवा मिळत नसल्याची बाब दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कपंनीवरील वाढत्या कामाचा ताण पाहता नविन पदे निर्माण करण्याची गरज असतानाही रिक्त पदे न भरल्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत असल्याची ग्राहाकांनी केलेल्या तक्रारीची दखलही संबंधित विभाग घेत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर जिल्हयातील वीज कंपनीतील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा येत आहे, तसेच ग्राहकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर काय कारवाई करणार आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. महावितरण कंपनीच्या यवतमाळ मंडळ कार्यालयाअंतर्गत दि.३१.०७.२०१५ रोजीच्या स्थितीप्रमाणे वर्ग १ ते ४ चे एकूण १,७८५ कर्मचारी मंजूर असून, त्यापैकी १,५९६ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत व १८९ पदे रिक्त आहेत. म्हणजेच केवळ १०.५८ % पदे रिक्त आहेत.

विद्युत ग्राहकांच्या तक्रारीबाबत महावितरण कंपनीकडून त्वरीत दखल घेण्यात येते व तक्रारींचे निरसन रिक्त पदांअभावी करता येत नाही. अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) १८९ रिक्त पदांपैकी ५२ पदे ही सरळसेवा भरतीची असून, या पदांसाठी परीक्षा घेऊन निवडसूची प्रकाशित करण्यात आलेली असून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती प्रक्रिया सुरु आहे.

तसेच उर्वरीत १३७ पदे पदोन्नतीच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड-जंजिरा (जि.रायगड) तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुतारमाळ आदिवासी वाडी वीज पुरवठापासून वंचित असल्याबाबत**

**(११) ३२०३८ (०८-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड-जंजिरा (जि.रायगड) तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुतारमाळ आदिवासीवाडी येथील जनतेने अनेक वेळा वीज पुरवठा करण्यासंदर्भात वारंवार मागणी करुनही अदयापर्यंत वीज पुरवठा करण्यात आला नसल्याने आजमितीस आदिवासी वाडी व समाज वीज पुरवठया पासून वंचित राहिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सुतारमाळ आदिवासीकडे येथे विद्युत पुरवठा करण्याच्या दृष्टीने शसनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुतारमाळ आदिवासीवाडी येथे वीज वाहिनीचे तांत्रिक अंदाजपत्रक दिन दयाल उपाध्याय ग्रामज्योती या योजनेमध्ये समाविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वीज थकबाकी शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेणार असल्याची ऊर्जा मंत्री यांनी केलेली घोषणा

**(१२) ३२५११ (०८-०१-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीज थकबाकी शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेणार असल्याची घोषणा ऊर्जा मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वीज थकबाकी शेतकऱ्यांवरील गुन्हे मागे घेण्याचा कृती आराखडा तयार केला आहे काय,
(३) असल्यास, याची अंमलबजावणी कधीपर्यंत करण्यात येणार, वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) या तालुक्यातील यंत्रमाग कारखान्यांकरिता सुरळीत विद्युत पुरवठा करण्याबाबत**

**(१३) ३३१४६ (२३-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) या तालुक्यातील यंत्रमाग कारखान्यांकरिता सुरळीत विद्युत पुरवठा करण्याकरिता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.व्यवस्थापकीय संचालक विद्युत महावितरण कंपनी मर्या. वांद्रे, मुंबई यांना दिनांक २६.११.२०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मालेगांव विभागात यंत्रमाग कारखान्यांचा विद्युत पुरवठा खंडीत झाला तर वाहिनीतील बिघाड दुरुस्त करण्यासाठी लागणारे साहित्य व डी.पी.तील दुरुस्तीचे साहित्य उपलबध असून त्यानुसार लगेच दुरुस्ती करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात येतो. मालेगांव विभागात एकूण ६३ केव्हीए चे १५४ वितरण रोहित्रे १०० केव्हीएचे ९२ वितरण रोहित्रे आणि १४.४ किमी कंन्डक्टर उपलब्ध आहेत. तसेच भविष्यात सुरळीत व योग्य विद्युतदाबाने वीजपुरवठा होण्यासाठी आय.पी.डी.एस. ही केंद्र शासनाची योजना प्रस्तावित असून या योजनेची रक्कम रु.३२३३.९५ लाख असून सदर योजना ही मंजूरीसाठी पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन या कार्यालयाकडे सादर केलेली असून मंजुरी आणि निधीची उपलब्ध झाल्यास सदरची कामे त्वरीत हाती घेण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात पंधराहून अधिक लॅपटॉपवर डेटा अपडेट करताना लॅपटॉप बंद पडत असल्याबाबत**

**(१४) ३३३५० (२३-१२-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात पंधराहून अधिक लॅपटॉपवर डेटा अपडेट करण्याचे काम तलाठी, मंडलाधिकारी आणि ऑपरेटर करत असून ऑनलाईन सात-बारा उतारा दुरुस्ती करुन मिळण्याबाबत नागरीकांची गर्दी होत आहे, परंतू लॅपटॉप मधून मधून बंद व हँग होणारे सर्व्हर मुळे नागरीकांना सात-बारा उतारा मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील उतारे दुरूस्त करण्यासाठी ३ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लागणार असल्याने जिल्हा प्रशासनाने तात्पूरत्या स्वरुपात सात - बारा देण्याबाबतची पर्यायी व्यवस्था सुरु करावी, अशी मागणी नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये डाटा अपडेशनच्यावेळी तांत्रिक अडचणी आल्यामुळे डाटा अपडेशन प्रणालीचा वेग कमी झाला होता. मात्र सदर प्रकरणी गा.न. नं.७/१२ उतारे दुरुस्ती करण्यासाठी येत असलेल्या अडचणी ह्या तत्कालीक व तात्पुरत्या स्वरुपाच्या असून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र पुर्ण यांच्या मदतीने वेळोवेळी सदर अडचणी सोडविण्यात आलेल्या आहेत. जेथे संगणकीकृत गा.न. नं.७/१२ हस्तलिखित गा.न. नं७/१२ नोंदीशी जुळत नाही तेथे संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मधील नोंद सुधारित करण्यासाठी शासनाने ई-फेरफार आज्ञावलीत “एडीट मॉड्यूल (Edit Module)” उपलब्ध करुन दिले असून दरम्यानच्या काळात आगामी पिक हंगामाकरीता शेतकरी खातेदारांना पिक कर्ज व शेतीविषयक प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न. नं.७/१२ उतारे दि.३१.०७.२०१६ पर्यंत वितरीत करण्यास शासनाने एक विशेष बाब म्हणून मान्यता दिली आहे.

---

### ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात येउुन एक वर्ष पूर्ण झाले परंतु एका वर्षात पालघर जिल्हयाची प्रगती न झाल्याबाबत

**(१५) ३३४१६ (०८-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा अस्तित्वात येऊन एक वर्ष पूर्ण होऊनही एका वर्षात पालघर जिल्हयाची काही प्रगती झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकिय कार्यालये भाड्याच्या इमारतीत असून, अनेक कार्यालयाची अजूनपर्यंत ठाणे कार्यालयातच कामे चालू आहे तसेच कर्मचाऱ्यांच्या नेमणूका अजूनपर्यंत झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय कामे होण्यास उशीर होत असल्याने, कर्मचाऱ्यांचे पगार व निवृत्तवेतन मिळण्यास उशीर होत असून अशा अनेक नवीन अडचणी निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नवीन पालघर जिल्हयाचा प्रगती होण्यासाठी शासकीय कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६)** :(१), (२), (३), (४) व (५) दि.१.८.२०१४ रोजी पालघर जिल्हा निर्मितीनंतर जिल्हामुख्यालयी विविध शासकिय विभागांची कार्यालये शासकिय व भाड्याच्या इमारतीत सुरु आहेत. पालघर जिल्ह्यासाठी विविध संवर्गाच्या शासनमान्य आकृतीबंधाप्रमाणे नीवन पदे निर्माण करण्याची कार्यवाही अनेक विभागात पूर्ण झाली असून उर्वरित विभागांसाठी सदर कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही संबंधित विभागांमार्फत सुरु आहे. शासकिय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते विहित वेळेत प्राप्त व्हावेत यासाठी “सेवार्थ” व “शालार्थ” संगणक प्रणाली सुरु करण्यात आली असून सेवानिवृत्ती वेतनाचे लाभही देण्यासाठी ऑनलाईन प्रणाली सुरु करण्यात आली आहे.

पालघर येथे उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीवर पालघर नव नगर व नवीन जिल्हा मुख्यालय सिडको लि. मार्फत विकसित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार पालघर येथील सर्व शासकीय कार्यालयांना शासकिय इमारती व सोयी-सुविधा उपलब्ध होणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ तालुक्यातील शासकीय जमिन शासनाने विम्को कं. या कंपनीस दिल्यानंतर सदर जमिन शासनाची कोणतीही परवानगी न घेता मातोश्री डेवलपर्स यांना हस्तांतर केल्याबाबत**

**(१६) ३३७१५ (१८-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील शासकीय जमिन शसनाने विम्को कं. या कंपनीस दिल्यानंतर सदर जमिन शासनाची कोणतीही परवानगी न घेता विम्को कं.कंपनीने आय.टी.सी.लि. व मातोश्री डेवलपर्स यांना हस्तांतर केल्यामुळे उपअधिक्षक, भूमिअभिलेख, अंबरनाथ यांनी सदर जमिनीची नोंद पुनर्विलोकनात घेवून रद्द केली आहे हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या अटी व शर्तीचा भंग करुन परस्पर जमिन विम्को कंपनीने हस्तांतरीत केल्यामुळे सरद जमिन शासनाने ताब्यात घेवून त्याची नोंद शासकीय जमिन अशी शासनाच्या भूमीअभिलेखमध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिन शासनाने ताब्यात घेवून स्वत:च्या नावावर नोंदविली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६)** :(१) होय.

(२) होय.

सदर जमिनीच्या मूळ नगर भूमापन चौकशी वेळी तत्कालीन चौकशी अधिकारी चांनी दाखल केलेला सदर जमिनीचा “क” असा सत्ता प्रकार उप अधिक्षक भूमी अभिलेख, अंबरनाथ यांनी त्यांच्या दि.२३.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये दुरुस्त करुन “ब-३” हा सत्ता प्रकार कायम करण्यात आला आहे. तद्नंतर जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांनी त्यांच्या दि.०३.१२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये उप अधिक्षक भूमी अभिलेख, अंबरनाथ यांनी केलेला दि.२३.०६.२०१५ चा आदेश कायम केला आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी त्यांच्या दि.१६.०३.२०१६ च्या आदेशान्वये विम्को लि. व "मातोश्री शेल्टर्स इंडिया प्रा.लि." यांनी शर्तभग केलेला असल्याचे दिसत असल्याने सदरची जमीन शासन जमा करण्याचे आदेश पारित केलेले आहे.

---

**जालना जिल्हा विद्युत वितरण कंपनीच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१७) ३४२१५ (१५-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा विदयुत वितरण कंपनीच्या कामाबाबात व त्या झालेल्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करुन कायदेशीर कारवाई करणेबाबत चे निवेदन दिनांक २२ ऑगस्ट, २०१५ वा त्या सुमारास मा.उर्जामंत्री वा सबंधीत अधिकाऱ्यांना देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना येथील खाजगी ठेकेदार मार्फत निकृष्ट दर्जाची काम करण्यात येऊन यामध्ये सबंधीत कार्यकारी अभीयंता यांनी गैरव्यवहार केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करण्याचे आदेश मा.उर्जामंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने गैरप्रकार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

जालना जिल्ह्यातील घनसावंगी व अंबड तालुक्यातील कामाबाबत दि.२२.०१.२०१३ चे निवेदन महावितरण कंपनीस प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) याबाबत महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली. कार्यकारी अभियंता विभाग क्र. २ जालना आणि तत्कालीन संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी ठेकेदारामार्फत सदरील कामामधील किरकोळ त्रुटी दुरुस्त करुन घेतल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यातील (जि.अहमदनगर) संपादित केलेल्या जमिनीच्या विक्रीबाबत**

**(१८) ३४४७९ (१३-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुकयातील (जि.अहमदनगर) संपादित केलेल्या जमिनीच्या विक्रीबाबत तलाठी तसेच कंपनीची सुरु असलेली चौकशी पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१६)** :(१) व (२) घोड प्रकल्पांतर्गत श्रीगोंदा तालुकयात झालेले भूसंपादन हे प्रकरण जुने असून त्याची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे चौकशीची कार्यवाही अद्याप सुरु असून जबाबदार कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिनांक १२.५.२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी अहमदनगर यांना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा शहरात (जिल्हा चंद्रपूर) खुल्या विद्युत वाहिन्यांमध्ये बदल करुन जमिनी खालून टाकण्याचे काम प्रलंबित असल्याबात**

**(१९) ३५०५७ (२३-१२-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा शहरात (जिल्हा चंद्रपूर) खुल्या विद्युत वाहिन्यांमध्ये बदल करुन त्या जमिनी खालून टाकण्याचे काम गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित असल्याने सुनिल हायटेक कपंनीचे कंत्राट रद्द करुन दुसऱ्या कंत्राटदारांकडून हे काम त्वरित करुन घेण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महावितरणाचे कार्यकारी अभियत्यांचेकडे दिनांक २१/८/२०१५ च्या सुमारास केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६)** :(१) होय.
(२) सदर मार्गावरील खोदकाम करुन भूमिगत केबल टाकण्याकरिता व वाहिनी पिलर बॉक्सेस उभारण्याकरीता पुरेशी जागा नसल्याने तसेच अरुंद रस्ता असल्यामुळे तेथील दुकानदारांनी विरोध केला व काम करु दिले नाही. सदर काम होत नसल्याने लघुदाब ओव्हरहेड वाहिनीचे रुपांतर भूमिगत वाहिनीमध्ये करण्याऐवजी उघडे तारा काढून खांबावर एरिअल बंच केबल टाकण्याचे ठरले. त्यानुसार मे, सुनिल हायटेक लि., नागपूर यांनी ७०० मीटर एरिअल बंच केबल खांबावर टाकून दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या**
**८६ पदापैकी ५० पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) ३५३०३ (२३-१२-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयामध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची ८६ पदे मंजूर असून त्यापैकी ५० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्हयातील पशुधनाच्या आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सांगिली जिल्ह्यात पशुधन विकास अधिकाऱ्यांची एकूण मंजूर पदे १०२ असून त्यापैकी ५१ पदे भरलेली आहेत व ५१ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

रिक्त असलेल्या पदांचा कार्यभार नजिकच्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपवून पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहे. सदर परिसरामध्ये जनावरांची कुठल्याही प्रकारची मरतुक झाल्याची तक्रार प्राप्त नाही.

(३) पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या पदावर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी (गट-क) या संवर्गातून पात्र उमेदवारांकडून पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाचे विचाराधीन असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यामधून पदोन्नत पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदावर पदस्थापना करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया व गडचिरोली पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे**

**(२१) ३५४१४ (२३-१२-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व गडचिरोली पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे तेथील नागरीकांना खाजगी सेवा द्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यात पशुधन विभगात गट अ, ब, क व ड संवर्गात एकूण मंजूर पदे १४९ असून त्यापैकी १०८ पदे भरली असून ४१ पदे रिक्त आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागात सर्व संवर्गात एकूण मंजूर पदे २४४ असून त्यापैकी १७५ पदे भरली आहेत व ६९ पदे रिक्त आहेत.

गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात जी रिक्त पदे आहेत त्या पदांचा अतिरिक्त कार्यभार जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिलेला असून पशुपालाकांना नियमित सेवा पुरवित आहेत.

(२) पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या पदावर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट- क या संवर्गातून पात्र उमेदवारांमधून पदोन्नतीने पदे भरण्याची बाब शासनाचे विचाराधीन असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यामधून पदोन्नत पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदावर पदस्थापना करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ येथील दिपनगर औष्णीक विद्युत प्रकल्पात तंत्रज्ञ-३**
**पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आल्याबाबत**

**(२२) ३६७११ (०८-०१-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ येथील दिपनगर औष्णीक विद्युत प्रकल्पात दिनांक ४ ऑगस्ट, २०१४ रोजी तंत्रज्ञ -३ पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरती प्रक्रिया पूर्ण होवूनही अद्याप पात्र उमेदवारांची यादी अद्याप घेषित केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पात्र असलेल्या उमेदवारांची यादी तात्काळ घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

महानिर्मिती कंपनीतर्फे संपूर्ण महाराष्ट्रातील पात्र प्रकल्पग्रस्त व सर्वसाधारण उमेदवारांकरीता तंत्रज्ञ-३ या पदासाठी सरळसेवेची जाहिरात देण्यात आली होती.

(२) प्राप्त उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर दि. २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) तंत्रज्ञ-३ या पदासाठी निवड झालेलया उमेदवारांना नियुक्ती पत्रे दि. १९ डिसेंबर, २०१५ रोजी देण्यारत आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा घोटी, (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे ३३ केव्ही, विद्युत उपकेंद्र उभारण्याबाबत**

**(२३) ३६९०१ (२३-१२-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक लोकप्रतिनिधी. (आर्णी), जि.यवतमाळ यांनी दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मा.ऊर्जा मंत्री व कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी, यवतमाळ यांच्याकडे मौजा घोटी, ता.घाटंजी, जि.यवतमाळ येथे ३३ केव्ही, विद्युत उपकेंद्र उभारण्यासंदर्भात मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, म.वि.वि.कंपनी लि., जि.यवतमाळ यांनी मौजा घोटी या ठिकाणी ३३ के.व्ही. वीज उपकेंद्र होण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तावित विद्युत पायाभुत सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत मौजे घोटी येथील ३३ के.व्ही. उपकेंद्राचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा बोरगाव (दाभडी) (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे वाढीव**
**५० विद्युत खांब व २ रोहित्रे मिळण्याबाबत**

**(२४) ३७११४ (०८-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनीधी. (आर्णी) यांनी अदर्श दत्तक ग्राम योजनेअंतर्गत मौजा बोरगाव (दाभडी) (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथे वाढीव ५० विद्युत खांब व २ रोहित्रे मिळण्याबाबत मा.कार्यकारी अभियंता यवतमाळ, म.रा.वि.वि. कंपनी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील विद्युत पुरवठा नुतनीकरण करणे, जुन्या डिपीवर (शेती पंपासाठीची) वीज जोडणी जास्त प्रमाणात असल्याने अल्प विद्युत पुरवठा अल्प प्रमाणात होत असल्याने २ नवीन रोहित्रे देण्यात यावी, व मारवाडी फाट्याजवळ वॉर्ड क्र. १ जुने रोहित्रे लाईन स्थलांतरीत करणे या मागण्यांच्या उल्लेख या निवेदनात करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कंपनी यवतमाळ यांनी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, यवतमाळ विभाग यांनी जिल्हानियोजन व विकासाअंतर्गत सर्वसाधारण विकास वर्ष २०१६-१७ चे योजनेअंतर्गत अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी दिली आहे. सदर कामांचा समावेश जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण वर्ष २०१६-१७ मध्ये करण्यात आलेला आहे. वर्ष २०१६-१७ चे वार्षिक नियोजनाकरीता जिल्हानियोजन कार्यालय यवतमाळ यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे. या कामांना जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांचेकडून प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर कामे सुरु करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विजेचे दर पूर्वीप्रमाणे ठेवल्याबाबत वीजवितरण कंपनीने निर्णय घेतल्याबाबत**

**(२५) ३७७५८ (१३-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जून, २०१५ पासून विविध गटासाठी विजेचे दर पूर्वीप्रमाणेच १७ ते २७ टक्के ठेवण्याचा निर्णय वीज वितरण कंपनीने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच महापारेषण कंपनीने वहन चार्ज एका महिन्यापूरता कमी केला होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज दर कमी केल्याचे दाखवून माहे आक्टोबर, २०१५ च्या सुमारास विद्‌युत नियमन आयोगाने वीज कायद्यातील तरतुदीनुसार वीज दरवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,

(५) असल्यास, या वीज दर वाढीमुळे राज्यातील गोरगरीब जनता आर्थिक संकटात सापडली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंब्रा, दिवा तसेच कल्याण ग्रामीण क्षेत्रामध्ये विजेचे तारा भूमीगत करुन,**
**जास्त रिडींग दाखवणारे मिटर बदलण्याबाबत**

**(२६) ३८७८८ (११-०१-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा, दिवा तसेच कल्याण ग्रामीण क्षेत्रामध्ये विजेचे तारा भूमीगत करणे, जास्त रिडींग दाखवणारे मिटर बदलणे तसेच विजेच्या दुरुस्ती व तांत्रीक बिघाडामुळे वारंवार विज पुरवठा खंडीत केला जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुंब्रा, दिवा तसेच कल्याण ग्रामीण मतदार संघातील विजेचा प्रश्न सोडविण्याची सातत्याने निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

उच्चदाब वाहिन्या ह्या डोंगर, जंगल परिसरातून मुंब्रा व दिव्यामध्ये येत असल्यामुळे व सदरहू उच्चदाब वाहिन्यांची लांबी जास्त असल्यामुळे पावसाळ्यात साधारणत: जुलै व ऑगस्टच्या दरम्यान काही ठिकाणी मोठी झाडे पडल्याने वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदरहू परिसर हा जंगल व डोंगराचा असल्याने वीज पुरवठा सुरळीत करण्यास वेळ लागला.

(२) हे खरे आहे.

(३) महापारेषणकडून गोटेघर येथे १०० केव्ही उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. तेथून २२ केव्हीच्या ८ उच्चदाब वाहिन्या मंजुर आहेत. तसेच दोस्ती, बेतवडे व मॅरेथॉन असे २२/११ के.व्ही. उपकेंद्र आर.ए.पी.डी.आर.पी. योजनेअंतर्गत मंजुर आहेत. गोटेघर उपकेंद्रातून २२ के.व्ही. च्या दोन विद्युत वाहिन्या काढण्यात आल्या असून त्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

तसेच कल्याण ग्रामिण क्षेत्रामध्ये ऑगस्ट, २०१५ मध्ये खंडीत झालेला वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी शीळ वाहिनीवर ऑगस्ट व सप्टेंबर, २०१५ मध्ये महिन्यात ३ जी.ओ.डी., सुमारे ३.८ कि.मी. उपरी वाहिनी व ८ उच्चदाब पोल बदलण्यात आले आहेत तसेच २२ के.व्ही नांदवली वाहिनीवर ३५० मिटर उपरी वाहिनी व २ पिन इन्सुलेटर बदलण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरु (जि.बीड) तालुक्यांत ३३ के.व्ही. क्षमतेची**
**१० केंद्र तातडीने कार्यान्वित करण्याबाबत**

**(२७) ३८८२५ (२२-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यांमध्ये ३३ के.व्ही. क्षमतेची १० विद्युत केंद्र कार्यान्वित करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

दि.३०.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये ३३/११ के.व्ही क्षमतेचे नविन उपकेंद्र आष्टी तालुका येथे ४ व पाटोदा तालुका येथे ३ व शिरूर तालुका येथे ३ अशी एकूण १० नविन विद्युत उपकेंद्रे कार्यान्वित करण्याची मागणी केलेली आहे.

(२) मौजे पारंगा ता.आष्टी या ठिकाणी मागणी केलेले ३३/११ केव्ही उपकेंद्र दिनद्याळ उपाध्याय ग्रामज्योती योजने अंतर्गत मंजूर आहे.

मौजे रुई ता.आष्टी या गावापासून सुमारे ५ किमी अतरावर टाकळी अमिया हे उपकेंद्र कार्यान्वित असल्याने मौजे रुई येथे मागणी केलेले ३३/११ केव्ही उपकेंद्र तांत्रिक दृष्ट्या सुसाध्य नाही. त्याचप्रमाणे मौजे गोमळवाडा ता.शिरुर का. या गावाजवळ सुमारे ५.५ मौजे गोमळवाडा येथे मागणी केलेले ३३/११ केव्ही उपकेंद्र सुसाध्य नाही. मौजे गहिनीनीथ गड ता.पाटोदा या गावापासून सुमारे ४.५ किमी अंतरावर लांबरवाडी हे उपकेंद्र कार्यान्वित असल्याने मौजे गहिनीनाथ गड येथे मागणी केलेले ३३/११ केव्ही उपकेंद्र सुसाध्य नाही.

मौजे भायाळ ता.पाटोदा याठिकाणी ३३/११ केव्ही उपकेंद्र मागणी केलेले आहे. परंतु ३३/११ केव्ही का., मौजे जाटनांदूर ता.शिरुर का,. मौजे बेलगाव (किन्ही) ता.आष्टी याठिकाणी मागणी केलेले ३३/११ केव्ही उपकेंद्र भविष्य काळात निधीच्या उपलब्धतेनुसार तांत्रिकदृष्ट्या तपासून प्रस्तावित करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, रत्नागिरी आणि गणपतीपूळे या तीन सागरी किणारी असलेले ठिकाणी भुयारी वीज वाहीनी टाकण्याबाबत

**(२८) ३८९२२ (११-०१-२०१६). श्री.संजय कदम (दापोली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, रत्नागिरी आणि गणपतीपूळे या तीन सागरी किणारी असलेले ठिकाणी भुयारी वीज वाहीनी टाकण्याकरिता केंद्र शासनाच्या एनसीआरएमपी या योजनेमधून रु.१४० कोटीचे प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे अद्याप पाठविण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्ताव केंद्र शासनाकडे लवकरात लवकर पाठविण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे. एनसीआरएमपी योजनेतंर्गत सर्व कामाची मंजुरी महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेद्वारा करण्यात येते. गुहागर, रत्नागिरी आणि गणपतीपुळे त्यापैकी रत्नागिरीची निवड जागतिक बँकेद्वारा करण्यात आली आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी**
**राज्य शासनाने दिलेले कृषि वीज बील सवलतीबाबत**

**(२९) ३९५९९ (१३-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळाचा सामना करीत असलेल्या मराठवाडयातील शेतकऱ्यांना कृषी वीज बील सुट योजनेतील ४६० कोटी रुपये निधीतील १६४ कोटी रुपये कपात करुन २९६ कोटी रुपयांचा निधी मराठवाडयासाठी देण्यात आला व विदर्भातील शेतकऱ्यांना ५७२ कोटी रुपायांचे पॅकेज देवून. मराठवाडयातील शेतकऱ्यांवर अन्याय करुन विदर्भाला न्याय देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज बिलातून दिलासा देण्यासाठी वीज बील माफीसाठी विशेष पॅकेज जाहिर केले होते. विदर्भातील ११ जिल्हयांसाठी ३५९ कोटी रुपये तर मराठवाडयातील ८ जिल्हयासाठी ४६० कोटी रुपये परंतु मराठवाडयाचे निधीतील कपात करुन ते विदर्भाकडे वळविण्यात आल्यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांत असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडयातील शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेले पॅकेज देण्याबाब शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
मराठवाडा कृषीपंप ऊर्जीकरणासाठी विभागास रु.४६० कोटी व विदर्भ विभागासाठी रु.३५९ कोटी इतके अनुदान मंजुर केलेले आहे. महाराष्ट्र शासन व महावितरण कंपनीतर्फे दुष्काळग्रस्त भागातील कृषी ग्राहकांना नियमित सवलतीच्या व्यतिरिक्त अतिरिक्त सवलत लागू करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पापडी (ता.वसई, जि.पालघर) येथील तलावाच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली ठेकेदाराने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत**

**(३०) ३९६७८ (२१-०४-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पापडी (ता.वसई, जि.पालघर) येथील तलावाच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली ठेकेदाराने बेकायदा माती उत्खनन करुन शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याप्रकरणी संबंधित ठेकेदारांवर कारवाई करुन दंडाची संपुर्ण रक्कम वसुल करण्याची मागणी तेथील नागरिकांनी माहे १२ मार्च, २०१५ रोजी मा.महसूल मंत्री महोदयांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाचा महसूल बुडविण्याऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या मौजे पापडी, ता. वसई येथील तलावाच्या सुशोभिकरणाच्या कामासाठी संबंधित कंत्राटदाराने विनापरवानगी सदर तलावातील गाळ काढल्याचे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आल्यावरुन, तहसिलदार वसई यांनी याबाबत रु.३,८३,६००/- एवढया दंडात्मक रकमेचा आदेश दिनांक ६/२/२०१५ रोजी पारित केला आहे.

संबंधित कंत्राटदार यांनी दंडाची रक्कम शासनजमा केलेली नसल्याने, सदरची रक्कम विहीत कार्यपध्दतीनुसार सक्तीच्या उपायांनी वसुल करण्याची कार्यवाही तहसिलदार, वसई यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळा तालुक्यात (जि. रायगड) तळा, सोनसडे, महागांव या ठिकाणी असलेल्या गुरांच्या दवाखान्यात पशुवैद्यकिय अधिकारी नसल्याबाबत**

**(३१) ४०४४२ (२०-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळा तालुक्यात (जि.रायगड) तळा, सोनसडे, महागांव या ठिकाणी असलेल्या गुरांच्या दवाखान्यात पशुवैद्यकिय अधिकारी नसून या दवाखान्याचा संपुर्ण कारभार शिपाई पाहत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दवाखान्यात पशुवैद्यकिय अधिका.यांच्या जागा रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ तळा, येथील पशुधन विकास अधिकारी यांच्या बदलीने हे पद दि.३०.६.२००९ पासून रिक्त आहे व पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, सोनसडे ता.तळा हे पद देखील बदलीने दि.३१.७.२०१० पासून रिक्त आहे. या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सहाय्यक पशुधन विकास अधिकारी हे नियमितपणे पहात असून पशुपालकांना नियमित सेवा पुरवित आहेत.

पवैद श्रेणी-२, महागांव येथे पशुधन पर्यवेक्षक या पदावर २०१५ पासून नियमित पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहे.

(३) पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या पदावर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी (गट-क) या संवर्गातून पात्र उमेदवारांकडून पदोन्नतीने भरण्याची बाब शासनाने विचाराधिन असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यामधून पदोन्नत पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदावर पदस्थापना करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फत्तेपुर (ता.जामनेर, जि.जळगाव) गावातील उपकेंद्राच्या कार्यालयात गेले असता तेथील कम्रचारी दारुची पार्टी करीत असल्याबाबत**

**(३२) ४४६७४ (२०-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फत्तेपुर (ता.जामनेर, जि.जळगाव) गावातील टाकळी पिंपरी रस्त्याकडील वीज पोल कोसळल्यामुळे तेथील वीज प्रवाह खंडित झाला असून याप्रकरणी गावकरी, सरपंच व इतर सदस्य उपकेंद्राच्या कार्यालयात गेले असता तेथील कम्रचारी दारुची पार्टी करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपकेंद्रात कनिष्ठ अभियंता नसल्यामुळे तेथील कर्मचारी मनमानी कारभार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कार्यालयात असे गैरप्रकार रोखण्यासाठी सदरहू उपकेंद्रात कनिष्ठ अभियंता नेमण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, या उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उपकेद्राच्या कार्यालयात दारु पिऊन गैरप्रकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०७-२०१६)** :(१) होय.

(२) महावितरण कुंपनीकडून फत्तेपुर शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंत्याच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य कनिष्ठ अभियंता यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

(३) सदर रिक्त पदावर अन्य सहाय्यक अभियंत्याची दि.०१.०२.२०१६ रोजीपासून पूर्णवेळ नेमणूक करण्यात आली आहे.

(४) व (५) कंपनीने संबंधित दोषी कर्मचाऱ्यास निलंबित करुन, त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुय्यम निबंधक कार्यालय कल्याण पूर्व येथे सुरु करण्याबाबत**

**(३३) ४५७६६ (२०-०४-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेतील स्थावर व जगंम मालमत्ता खरीदी विक्रीसाठी कल्याण पश्चिमेला जावे लागत असून कल्याण पुर्व शहराची लोकसंख्या व वाढता विस्तार लक्षात घेता दुय्यम निबंधक कार्यालय कल्याण पुर्वे येथे सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक कार्यालय कल्याण येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) डोंबिवली पूर्व येथील सह दुय्यम निबंधक वर्ग-२, कल्याण क्र.५ हे कार्यालय कल्याण पूर्व परिसरात स्थलांतरीत करणेकरीता शासकीय मानकाप्रमाणे जागेचे उपलब्धतेबाबत नोंदणी उपमहानिरीक्षक, ठाणे यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे. तसेच खाजगी जागा मालक यांचेकडे जागेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गुंतवणूक केलेल्या दूध योजनांच्या वसूलीबाबत**

**(३४) ४६६८९ (२०-०४-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३८ शासकीय दूध योजनांसाठी राज्य शासनाने एकूण ४४ हजार ४५० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गुंतवणूक केलेल्या दूध योजनांपैकी मुंबईतील वरळी, गोरेगाव, सोलापूर, रत्नागिरी, नाशिक, वर्धा, औरंगाबाद व नागपूर या ८ दूध शासकीय योजना फायदयात असून या योजनांमधील केलेली शासकीय गुंतवणूक पूर्णपणे वसूल झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरित शासकीय दूध योजना तोटयामध्ये असण्याची कारणे काय आहेत, व त्यांचेकडून शासकीय गुंतवणक केव्हा वसुल करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६) :**(१) नाही.

शासनाने आत्तापर्यंत राज्यात एकूण ३८ दुग्धशाळांची स्थापना केली असून, त्याकरीता सुमारे रुपये १३४.१४ कोटी इतका खर्च आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण भागातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना शेतीपूरक जोडधंद्यापासून उत्पादित दूधास वाजवी दर मिळावा व शहरी भागातील सर्वसामान्य ग्राहकांना किफायतशीर दराने दूध उपलब्ध करुन देण्याच्या मुळ उद्देशाने दुग्धशाळांची स्थापना केली आहे.

शासकीय दूध योजना ह्या कल्याणकारी योजना म्हणून राबवण्यात आल्या आहेत. त्यामागे शासनाचा नफा मिळवणे हा उद्देश नव्हता त्यामुळे गुंतवणूक वसूल करण्याचा किंवा झाल्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) शासकीय दूध योजना तोट्यात असण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) दूध खरेदी दर व वरकड खर्च मिळून दूध उत्पादन खर्च विक्रि दरापेक्षा जास्त असतो. परंतू ग्राहकांना रास्त दरात दूध उपलब्ध व्हावे यासाठी दूध विक्रिची किंमत वाजवी ठेवावी लागते.

आ) दुग्धव्यवसायात सहकार व खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढल्याने शासनाच्या दुग्धशाळा हाताळणी क्षमतपेक्षा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे प्रक्रिया व उत्पादन खर्च जास्त येतो.

इ) शेतकऱ्यांच्य हिताच्या दृष्टीने बाजारातील अतिरिक्त दूध खरेदी करुन त्याचे दूध भुकटी व लोण्यात रुपांतर करावे लागते. यामध्ये शासनास मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोटा सहन करावा लागतो.

ई) दुग्ध शाळांमधील यंत्रसामुग्री ३०-३५ वर्षे जूनी असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे देखभाल व दुरुस्तीवर जास्त खर्च करावा लागतो.

उ) कर्मचारी व कामगारांच्या वेतन व भत्त्याच्या वेळोवेळी होणाऱ्या वाढीमुळे तोट्याच्या प्रमाणात वाढ होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्यान्वये गाव किंवा बैलांचे मांस (बीफ) खाणे,**
**विक्री-वाहतूक करणे, बाळगणे व आयात करण्याच्या बंदीबाबत**

**(३५) ४६९७३ (१७-०५-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्यान्वये गाव किंवा बैलांचे मांस (बीफ) खाणे, विक्री-वाहतूक करणे, बाळगणे, आयात करणे यावर बंदी घालण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्यांची अंमलबजावणी बाबत राज्य शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

राज्यात दि.४ मार्च, २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू करण्यात आला आहे. या कायद्यातील तरतूदींनुसार राज्यात गाय, वळू किंवा बैल या गोवंशीय प्राण्यांची कत्तल करणे, कत्तल करविणे, कत्तलीसाठी वाहतूक, कत्तलीसाठी निर्यात, कत्तलीसाठी खरेदी/विक्री/विल्हेवाट लावणे तसेच गाय, वळू किंवा बैल यांचे मांस बाळगण्यास मनाई आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पाचोरा, ता.पाचोरा, जि.जळगाव येथील निवासी हे १९८५ पूर्वीचे अतिक्रमित झोपडपट्टीवासियाना नियमानुकूल करण्याबाबत**

**(३६) ४७१९५ (२०-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाचोरा, ता.पाचोरा, जि.जळगाव येथील श्रीकृष्ण नगर व श्रीराम नगर व तसेच भडगांव तालुक्यातील यशवंतनगर मधील निवासी हे १९८५ पूर्वीचे अतिक्रमित झोपडपट्टीवासिय असून या झोपडपट्टीवासियांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन १०९९/प्र.क्र. २७/ज-१ दि. २८.९.१९९९ नुसार ही अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. महसूल मंत्री, यांना माहे १० जून, २०१५ रोजीच्या सुमारास निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निवेदनानुसार शसनाने निर्णय घेतला आहे व, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१), (२) होय, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, पाचोरा भाग व तहसिलदार पाचोरा यांना चौकशी करण्याकामी कळविण्यात आले होते. त्यानुसार अतिक्रमण झालेल्या जागेवर नगरपालिकेचे आरक्षण असल्याने सदर आरक्षण उठविल्याशिवाय कार्यवाही करणे उचित नसल्यास अहवाल जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडे सादर केलेला आहे. तसेच मुख्यधिकारी नगरपरिषद पाचोरा यांचे दिनांक ७/१/२०१६ चे पत्रान्वये पाचोरा नगरपरिषद क्षेत्रातील श्रीकृष्ण नगर व श्रीराम नगर जमिनीवर पाचोरा शहराच्या दुसरी सुधारित वाढीस हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमाक १०३ अन्वये गट नं.२२ पै., २३ पै. (स.नं. १५ पै.) जागेवरील क्षेत्र २.५० हे. आर क्षेत्रावर "स्लम इम्प्रुव्हमेंट" चे आरक्षण दर्शविलेले आहे. सदर जागा शासन मालकीची असून समुचीत प्राधिकरण पाचोरा नगर परिषद आहे. अतिक्रमण केलेल्या झोपडपट्टीवासियांची नगर परिषद मालमत्ता रजिष्टर वरुन नोंद दिनांक १/१/१९९५ पुर्वीची असल्याबाबत त्यांचे नावासमोर "होय/नाही" अशी नोंद करण्यात आलेली आहे, तसेच काही मिळकत धारकांचे नावात बदल झालेला आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पाचोरा यांनी सादर केला आहे.

तसेच भडगांव येथील यशवंतनगर येथील झोपडपट्टीवासीय यांनी नगरपालिका भडगांव यांचे मालकीचे जमिनीवर अतिक्रमण केलेले असुन ते १/१/१९९५ पुर्वी अतिक्रमण करुन रहात होते काय, याबाबत चौकशी करण्यात येवुन शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २८/९/१९९९ नुसार अतिक्रमण झोपडपट्टीवासियांची अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत झोपडपट्टीवासियांची पात्रता तपासून शासन निर्णय व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व त्याखालील नियमानुसार कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा व शहादा तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन अधिका-यांची व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) ४७३९४ (२०-०४-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा व शहादा तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन अधिका-यांची व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे पाळीव जनावरांची औषध उपचाराची सोय नसल्याने वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाळीव जनावराना उपचार मिळण्याकरिता सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शहादा तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-१ ची ८ पदे मंजूर असून ४ पदे भरलेली आहेत. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-२ ची ५ पदे असून ही ५ पदे भरलेली आहेत. तळोदा तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी श्रेणी-२ ची ३ पदे असून ही ३ पदे भरलेली आहेत. दोन्ही तालुक्यातील श्रेणी-१ चया रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे देण्यात आला असून पशुपालकांच्या पाळीव जनावरांवर पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे पशुवैद्यकीय सेवा नियमितपणे उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे पशुपालकांची जनावरे औषधोपचाराविना वंचित राहिलेली नाहीत.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे पशुधन विकास अधिकारी या संवर्गाकरिता ३०० उमेदवारांची निवड करुन त्यांची नियुक्तीकरीता शासनाकडे शिफारस केली होती. तथापि, महसुली विभाग वाटप पध्दतीमध्ये शहादा तालुक्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरता आलेली नाहीत. पशुधन विकास अधिकारी श्रेणी-१ या संवर्गात रिक्त असलेली पदे सरळसेवेने भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतात उभारलेल्या विज वाहीनीच्या मनो-यांचा मोबदला न दिल्याबाबत**

**(३८) ४७७७० (२०-०४-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयात अनेक शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये अति उच्च दाबाच्या विज वाहिनीसाठी विज मनोऱ्यांची उभारणी करण्यांत आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतात उभारण्यांत येणाऱ्या विज मनोऱ्यांचा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आला नसल्याने याप्रकरणी जिल्हयात आंदोलने केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मोबदला शेतकऱ्यांना तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) उप विभागीय अधिकारी बुलढाणा यांच्या उप विभागातील बाधीत शेतकऱ्यांना संबंधित कंपन्यांकडून शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. संक्रीर्ण-०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४ दिनांक ०१.११.२०१० नुसार मोबदला देण्यात आला आहे. तसेच उप सिंदखेडराजा यांच्या उपविभागातील मोबदल्याची प्रकरणे त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टिने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १ जून, २०१६ रोजी त्यांच्या स्तरावर बैठक घेऊन सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने त्वरीत कार्यवाही करण्याचे संबंधितांना निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चोरवणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावच्या विभाजनामध्ये दुरूस्ती करण्याची केलेली मागणी**

**(३९) ४८९७० (२१-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे चोरवणे (ता.खेड, जि.रत्नागिरी) या गावच्या झालेल्या विभाजनामध्ये दुरूस्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मंडळाने जानेवारी २०१६ च्या पहिल्या सप्ताहात शासनाकडे निवेदनाद्वार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१६) :**(१), (२) व (३) चोरवणे उतेकरवाडी ता. खेड जि.रत्नागिरी येथील ग्रामस्थांनी चोरवणे उतेकरवाडी या गाव विभाजनामध्ये दुरुस्ती होणेबाबत दिनांक १०.१२.२०१५ रोजी निवेदन दिले आहे. सदरहू मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत उक्त ग्रामस्थांनी मागणी केल्याप्रमाणे गावाचे विभाजन करावयाचे झाल्यास भौगोलिकदृष्टया सोयीचे होणार नसल्याने व गाव विभाजनास ग्रामस्थांचे एकमत नसल्यामुळे कोणतीही दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ४० अधिक २ शेळ्यांचे गट ५० टक्के अनुदानावर वाटप केले जात असल्याबाबत**

**(४०) ४९५७६ (०३-०५-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ४० अधिक २ शेळ्यांचे गट ५० टक्के अनुदानावर वाटप केले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेसाठी शासनाने ५० टक्के अनुदानाची रक्कमच न दिल्याने ही योजना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ११ महिने होऊनही व सर्व बाबींची पुर्तता करूनही लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेला अनुदान देऊन बेरोजगारांना शेळ्यांचे गट वाटप करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास सन २०१४-१५ या वर्षात रु.१००.०० लाख निधी वितरीत करण्यात आला असून त्या निधीतून ६८ गट वाटप करण्यात आले आहेत. सन २०१५-१६ या वर्षात रु.९००.०० लाख वितरीत करण्यात आले असून त्यानुसार या योजनेखाली उर्वरीत ५९२ लाभार्थ्यांना शेळी गट वाटप करण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात उच्च व कमी दाबाच्या विद्युत वाहिन्यांमुळे जिल्हयातील ११ प्रकल्प बांधीत झाले असल्याबाबत**

**(४१) ४९८७० (२०-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात उच्च व कमी दाबाच्या विद्युत वाहिन्यांमुळे जिल्हयातील ११ प्रकल्प बांधीत झाले असून अधिकाऱ्यांच्या हेकेखोरपणामुळे संबंधित सिंचन प्रकल्पाची कामे ठप्प झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुडीत क्षेत्रामुळे बाधित होणाऱ्या उच्च व कमी दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थालंतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) गायवाड निम्न पाटबंधारे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या महापारेषण कंपनीच्या अति उच्च दाब वाहिनीच्या स्थानांतरणासाठीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कार्यादेश दिल्यानंतर सहा महिन्यांच्या आत सदर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर जिल्हा लातूर येथील पशुधन आहार व्यवस्थापानाबाबत**

**(४२) ५०११० (२०-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर जिल्हा लातूर येथे पशू व मत्स्य विज्ञान विदयापिठाची उपकेंद्र अंतर्गत शासनाच्या पडीक जमिनी विकास कार्यक्रम राबून पसुधानाच्या आहार व्यवस्थापनाकारिता. संशोधनार्थ राज्य शासनाने स्वतंत्र प्रषेत्र विकास करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाकडे मागणी केली होती हे खरे आहे काय

(२) असल्यास, या मागणीनुसार राज्य शासनाने विद्यापीठा व प्रशासनासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला आहे काय वा देण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३१-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्हयात अवैध वाळू उपशावर नियंत्रण ठेवणारी**
**स्मार्ट मोबाईल प्रणाली कार्यान्वीत नसल्याबाबत**

**(४३) ५०४०० (२०-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील अवैध वाळू उपशावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हयातील सर्व वाळू पट्टयांवर वाळु उपसा करणाऱ्यां वाहनांची अचूक नोंद घेण्याबाबत स्मार्ट मोबाईल प्रणालीचा वापर करण्यात येत आहे हे खरे आहे,

(२) असल्यास, मागील चार महिन्यापासून जिल्हयात वाळू पटयांचा लिलाव न झाल्याने स्मार्ट मोबाईल प्रणाली वापाराविना पडून असल्याचे २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, जिल्हयातील वाळू पट्यातील लिलाव न झाल्याने वाळू चोरीचे प्रमाणात वाढ झाली असून स्मार्ट मोबाईल प्रणाली बंद असल्याने वाळू चोरीवर नियंत्रण ठेवण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१६) :**(१) व (२) राज्यात सन २०१४-१५ या वर्षाकरीता वाळू वाहतूकीसाठी SMATS प्रणाली लागू करण्यात आली असून, सदर वर्षाच्या लिलावाचा कालावधी दिनांक ३०.९.२०१५ रोजी संपुष्टात आल्याने, सदर प्रणाली बंद करण्यात आली होती. सन २०१५-१६ या वर्षाचे लिलाव झालयानंतर सदर प्रणाली पुन्हा ३१ मार्च, २०१६ पर्यंत सुरु ठेवण्यात आली केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या दि१५ जानेवारी, २०१६ च्या अधिसूचनेतील निर्देशांचा विचार करुन दिनांक १/४/२०१६ पासून वाळूची वाहतूक करताना बारकोड असलेले वाहतूक पासेस वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) गौणखनिजाच्या बवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी उपविभागीय व तालुकास्तरावर दक्षता पथके गठित करण्यात आली आहेत. सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासण्या करुन, वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक, तसेच यंत्रसामग्री व वाहने जप्त करण्याची कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपूर तालुक्यातील (जि.लातुर) शिरुर ताजबंद येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी**
**पशुधनविकास अधिकारी, व इतर रिक्त असलली पदे भरण्यबाबत**

**(४४) ५०५७३ (२०-०४-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अहमदपूर तालुक्यातील (जि.लातुर) शिरुर ताजबंद येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी पशुधनविकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, दोन सेवक तसेच वनौपचारक ही पदे मंजुर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर असलेली पदे मागील दोन वर्षापासुन भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पदे रिक्त असल्यामुळे या भागातील गरीब शेतकऱ्यांना आपली जनावरे खाजगी पशुवैद्यकिय दवाखान्यातघेवून जावी लागत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

पशुवैद्यकीय दवाखाना शिरुर ताजबंद येथील पशुधन विकास अधिकाऱ्यांचे पद ८ महिन्यांपासून रिक्त असून इतर सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. पशुधन विकास अधिकारी शिरुर ताजबंद या पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी, फिरता पवैद चापोली, ता.चाकुर, जि.लातूर यांचेकडे सापेविण्यात आला आहे. त्यांचेमार्फत पशुवैद्यकीय दवाखाना शिरुर ताजबंद येथील पशुधन पर्यवेक्षक यांच्याकडून पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविली जाते. त्यामुळे पशुपालकांना खाजगी सेवा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही व पशुपालकांकडून अशा कुठल्याही तक्रारी प्राप्त नाही. तसेच साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही.

(४) पशुधन विकास अधिकारी (गट-ब) या पदावर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी गट-क या संवर्गातून पात्र उमेदवारांमधून पदोन्नतीने पदे भरण्याची बाब शासनाचे विचारधीन असून सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यामधून पदोन्नत पशुधन विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदांवर पदस्थापना करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चिखलडोंगरे,तसेच मौजे कामण (ता.वसई, जि.पालघर)**
**येथील महापारेषण कंपनीच्या उपकेंद्राच्या कामाबाबत**

**(४५) ५१३३१ (२०-०४-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखलडोंगरे (ता.वसई, जि.पालघर) या गावातील स.लं. ३०४ विरार (प.) येथे अती उच्च दाबाचे २२०/२२ के.व्ही. चे महापारेषण कंपनीचे उपकेंद्र मंजूर असून ह्या उपकेंद्रामुळे साधारण ५ लाख ग्राहांची अपुऱ्या वीज पुरवठामुळे होणारी गैरसोय दुरु होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत उपकेंद्रासाठी लागणाऱ्या जमीनीचे संपादनाचे काम पूर्ण झाले काय,
(३) तसेच मौजे कामण ता. वसई,जि.पालघर, येथे २२०/२२ केव्ही, १०० एमव्हीए क्षमतेच्या उच्च दाबाचे बसस्टेशन मंजूर असून जागे अभावी ह्या सबस्टेशनचे जी.आय.एस. पध्दतीमध्ये रुपांतरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.ऊर्जा मंत्री महोदयांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत उपकेंद्रासाठी महापारेषण कंपनीमार्फत भू-संपादनाची प्रक्रिया सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मौजे चिखलडोंगरी, ता.वसई, जि.पालघर येथील २२०/२२ के.व्ही. उपकेंद्रासाठी शासकीय जमीन मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव महसूल व वन विभागाच्या विचाराधीन आहे.

मौजे कामण, ता.वाई. जि.पालघर येथील २२०/२२ के.व्ही. उपकेंद्र उभारणीसाठी संपादित करावयाच्या जागेवर अतिक्रमण झाले असल्यामुळे सदर जागेची दि.१७.०३.२०१६ रोजी मोजणी करण्यात आली असून मोजणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. मोजणी अहवालानुसार प्रत्यक्ष जमिनीवर उपकेंद्र उभारणीसाठी किती जमीन शिल्लक आहे, याची तपासणी केलयानंतर उपकेंद्राची जी.आय.एस. पध्दतीमध्ये रुपांतरित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मिरज (जि.सांगली) येथील दूध डेअरी बंद असल्याने सुमारे २०० कामगारांवर उपासमरीची वेळ आल्याबाबत**

**(४६) ५२०९३ (२०-०४-२०१६). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) येथील शासकीय दूध डेअरीत दूध पुरवठा होत नसल्यामुळे गेली ०२ वर्ष बंद असल्याने सुमारे २०० कामगारावर उपासमारीची वेळ आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दूध डेअरीच्या जीर्ण इमारतीचे रचनात्मक परिक्षण करण्याचा आदेश दुग्धव्यवसाय विभागामार्फत नुकताच देण्यात आलेला असताना, डेअरीतील दुधाची भुकटी तयार करणारी यंत्रणा कालबाह्य झालेली असून तिच्या नुतनीकरणाच्या खर्चास शासनाने अद्यापही मान्यता दिलेली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर डेअरीची इमारत दुरूस्ती व दुध भुकटी यंत्रणेचे नुतनीकरण करंण्याच्या दृष्टीणे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१४-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) प्रकल्पातील संयंत्रे मोठ्या प्रमाणात कालबाह्य झालेली तसेच इमारतदेखील जीर्ण झालेली आहे. सबब शासकीय दुध योजना, मिरज येथील दूध भुकटी प्रकल्पांची यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी येणारा खर्च व दुरुस्ती कामे करण्याऐवजी प्रकल्प निकाली काढणे अधिक व्यवहार्य होईल किंवा कसे ही बाब तपासून धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात राबविण्यात आलेल्या केज कल्चर प्रकल्पांतील गैरव्यवहारांची चौकशी करण्याबाबत**

**(४७) ५२२६७ (२०-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राबविण्यात आलेल्या केज कल्चर प्रकल्पांची माहिती मिळणेबाबत तसेच गैरव्यवहारांची चौकशी करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी व्यवस्थापकीय संचालक, मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांना माहे २७ जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व उक्त निवेदनाच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, यांनी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३१-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
या संदर्भात लोक प्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक, मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांना दिनांक २० जानेवरी, २०१६ च्या पत्रान्वये केज कल्चर प्रकल्पाबाबत माहिती मिळणेबाबत निवेदन दिले आहे. तसेच दिनांक २७/१०/२०१५ च्या पत्रान्वये शासनास सदर प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत निवेदन दिले आहे.
(२), (३) व (४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्याकडून लोक प्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २ मे, २०१६ च्या पत्रान्वये माहिती देण्यात आलेली आहे व आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मस्त्योद्योग विकास महामंडळ यांना सदर प्रकरणी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**वडव, नागनाथ (ता.चाकूर, जि.लातूर) येथील पशुवैद्यकिय अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत**

**(४८) ५२३३० (२०-०४-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर तालुक्यातील (जि.लातूर) वडव, नागनाथ येथील पशुवैद्यकिय दवाखान्यातील पशुवैद्यकिय अधिकारी दवाखान्यातील सेवक व अंशकालीन कर्मचाऱ्यांची पदेही रिक्त असल्याने सदरहू दवाखाना कार्यरत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडव, नागनाथ येथील पशुवैद्यकिय दवाखान्यातील पशुवैद्यकिय अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आजमितीस न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वडव, नागनाथ येथील पशुवैद्यकिय दवाखाना कार्यरत होण्यासाठी पशुवैद्यकिय अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांची असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१३-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

पवैद वडव, नागनाथ ता.चाकूर जि.लातूर येथील पशुधन विकास अधिकारी दि.३१.११.२०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे पद रिक्त आहे. सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी पवैद चाकूर यांचेकडे देण्यात आलेला आहे. तसेच दवाखान्यातील सेवक व अंशकालीन कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आलेली आहेत. त्यांचे मार्फत पवैद वडव, नागनाथ येथील पशुपालकांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे आणि दवाखाना बंद असल्याबाबत कोणाचीही तक्रार प्राप्त नाही.
(३) वडव, नागनाथ येथील पशुधन विकास अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पशुधन विकास अधिकारी चाकूर यांचेकडे सोपवून पशुपालक धारकांना नियमित वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत व इतर संवर्गाची पदे यापूर्वीच भरण्यात आलेली असल्याने पशुवैद्यकीय दवाखाना वडव, नागनाथ हा नियमितपणे कार्यरत असून पशुपालकांना नियमित सेवा पुरविण्यात येत आहे. तसेच पवैद श्रे-१ वडव, नागनाथ दवाखाना बंद असल्याबाबत व या दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात कुठेही साथीच्या रोगाने जनावरे दगावल्याच्या तक्रारी प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथे बदलेल्या भौगोलिक दस्ताऐवज सरकारकडून अद्यावत केले जात असल्यामुळे येथील भूमीअभिलेख अधिकारी व कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याबाबत**

**(४९) ५२४१६ (२०-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथे बदलेल्या भौगोलिक व इतर परिस्थितीनुसार सुमारे १०० वर्षापुर्वीचे दस्ताऐवज शासनाकडून अद्यावत केले जात असल्यामुळे येथील भूमी अभिलेख अधिकारी व कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने होणारे हल्ले रोखण्यासाठी संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१६)** :(१) असे सर्वसाधारणपणे निदर्शनास आले नाही. मगील काही महिन्यात ठाणे जिल्ह्यात श्री.डी.पी.चौधरी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांना दि.२६.१०.२०१५ रोजी व श्री.निलेश दुबळे, भूकरमापक, उप अधीक्षक भूमी अभिलेख, तलासरी यांना दि.२०.०४.२०१६ रोजी शासकीय मोजणीचे काम करीत असताना मारहाण करण्यात आल्याचे अपप्रसंग घडले होते. परंतु ही मारहाण सुमारे १०० वर्षापूर्वीचे दस्ताऐवज शासनाकडून अद्यावत केले जात असल्यामुळे झालेली नसून शासकीय मोजणी काम करीत असताना संबंधित अर्जदार व लगतचे कब्जेदार यांच्यातील वैयक्तिक मतभेदामुळे जागेवर वाद निर्माण होऊन झालेली आहे.

(२) व (३) श्री.डी.पी.चौधरी, उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर व श्री.निलेश दुबळे, भूकरमापक, उप अधीक्षक भूमी अिभलेख, तलासरी यांना मारहाण करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर पोलीसांकडे गुन्हे दाखल करण्यात आलेले असून, सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत चौकशीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माजलगांव (जि.बीड) नगर परिषदेने आठवडी सार्वजनिक बाजारासाठी खुल्या जागेची मागणी केल्याबाबत

**(५०) ५२७४१ (२०-०४-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) नगर परिषदेने आठवडी सार्वजनिक बाजारासाठी सर्वे नं. ३८० मधील खुल्या जागेची मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या कडे २०१३ व त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बीड यांनी १३ जुन, २०१४ रोजी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी माहे २६ ऑगस्ट, २०१४ रोजी जमीन मिळण्याबाबतचा प्रस्ताव माहे ९ फेब्रुवारी, २०१० च्या शासन परिपत्रकानुसार सविस्तर प्रस्ताव पाठवण्याच्या सुचना जिल्हाधिकारी बीड यांना दिल्या, आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड व संबंधीत अधिका-यांनी माहे २६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत अदयाप कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी बेजबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांनवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

माजगाव (जि.बीड) नगर परिषदने मागणी केलेल्या स.नं.३८० मध्ये नगरपरिषद यांची विविध आरक्षणे असल्याने त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात आठवडी बाजार भरविणेसाठी अटी व शर्तीवर परवानगी देता येईल किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी माहे जानेवारी, २०१४ मध्ये विभागीय आयुक्त यांचे मार्गदर्शन मागविले होते.

(३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे निर्देशानुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी उपविभागीय अधिकारी, माजलगांव, जि.बीड यांना या कामी प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मौजे माजलगाव येथील स.नं.३८० मध्ये विद्यमान शासकीय विश्राम गृह, कॉटन फेडरेशन, एस.टी.स्टँड डेपो, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ कॉलेज, विद्यमान रहीवास अभिन्यासासह आरक्षण क्र.२१, बगीच्याचे आरक्षण व विद्यमान तसेच उर्वरित भाग शेती विभागात प्रस्तावित आहे. सदरचे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून सदरच्या जागेचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यास दिनांक २/१२/२०१३ चे पत्रान्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद, माजलगांव यांना कळविले होते. अद्यापपावेतो सदर आरक्षण वगळून विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

तसेच सदरच्या स.नं.३८० मधील सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगांव यांच्या ताब्यात असलेल्या व बाजारासाठी प्रस्तावित असलेल्या व बाजारासाठी प्रस्तावित असलेल्या २ हे.जमीनीचा वाद जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.